
## ३. समता व न्याय

**प्र. १ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा:**
१) **<u>लोकशाही</u>** हा राजकीय समतेचा पाया आहे.
२) जॉन रॉल्स हे **<u>वितरणात्मक</u>** न्यायचे पुरस्कर्ते होते.

**ब) दिलेल्या विधानान साथी समर्पक संकल्पना लिहा:**
१) व्यक्तिच्या व्यक्तिमहत्व विकाससाठी प्रत्येकाला संधी मिळणे आवश्यक असते, असे मानणारे समतेचे तत्त्व.
**उत्तर : समान संधी चे तत्त्व**
२) प्रत्येक नागरिकास राज्यकारभारत सहभागी होयचा अधिकार आहे, असा समतेचा प्रकार.
**उत्तर : राजकीय समता**
३) आर्थिक शोषनाचा अभाव.
**उत्तर : आर्थिक समता**

**क) योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा.**
१) भारतात अस्पृश्यता निवारणासाठी कायदे करण्यात आले कारण ......
उत्तर : भारतात अस्पृश्यता निवारणासाठी कायदे करण्यात आले कारण; **<u>कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विषमता नियंत्रित केली जाते.</u>**

**प्र. २ अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा. (उत्तर)**




**प्र. 3 खलील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा :**
**1) लोकशाही मध्ये समता नाकारली जाते.**
**उत्तर :** हे विधान चूक आहे.
कारण : राजकीय समता लोकशाहीचा पाया आहे.

**2) समता हे राजकीय ध्येय  आहे**
**उत्तर :** हे विधान बरोबर आहे.
**कारण :** आधुनिक काळात समतेचा विचार राजकीय ध्येय म्हणून करण्यात येतो.

**3) सामाजिक लोकशाही हा राजकीय लोकशाहीच पाया आहे.**
**उत्तर :** हे विधान बरोबर आहे.
**कारणे :** 1) सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही निरर्थक आहे.
2) ज्या देशात वंश, जाती, धर्म, भाषा आणि लिंगभेद यांच्या आधारे भेदभाव केले जातात; त्या देशात राजकीय लोक्षाहीचा पाया कमकुवत असतो.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा :**
**(१) समता व न्याय.**
उत्तर : समता व न्याय यांतील सहसंबंध पुढीलप्रमाणे आहेत
(१) विषमता ही अन्यायमूलक आहे.
(२) न्याय्य स्थिती निर्माण होण्यासाठी समता आवश्यक आहे.
(३) समाजातील सर्व व्यक्तींच्या मूलभूत गरजांची पूर्तता होण्यासाठी
संसाधने न्याय्य वितरण हे तत्त्व स्वीकारण्याची गरज असते.

**(२) वैधानिक न्याय व सामाजिक न्याय.**
**उत्तर :** वैधानिक न्याय व सामाजिक न्याय यांतील सहसंबंध
पुढीलप्रमाणे आहेत :
(१) न्याय या अमूर्त संकल्पना व्यावहारिक पातळीवर  कायद्याचा रूपाने अंमलबजावणी होते तेव्हा त्याला सामाजिक न्याय असे म्हणतात.
(२) अस्पृश्यता, जातिवाद, लिंगभेद इत्यादी सामाजिक अन्यायाची अभिव्यक्ति आहे.
(३) सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी, म्हणजेच सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अस्पृश्यता निर्मूलन, समान कामासाठी स्त्री व पुरुष कामगारांस समान वेतन असे कायदे करण्यात येतात.
(४) वैधानिक न्यायाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करता येते.

**प्र. ५ आपले मत नोंदवा.**
**(१) सामाजिक समतेमध्ये जातिभेद अडथळा ठरतो.**
**उत्तर :** (१) पारंपरिक भारतीय समाजव्यवस्थेची उतरंड वर्ण किंवा जातिव्यवस्थेवर आधारित आहे. वर्णव्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र अशी समाज घटकांची विभागणी करण्यात येते.
(२) कालांतराने वर्णव्यवस्थेचे जातिव्यवस्थेत रूपांतर झाले. त्यातून उच्च-नीच अशी झालेली समाजाची विभागणी समतेच्या तत्त्वाशी विसंगत होती.
(३) कनिष्ठ स्तरावरील शूद्रांना हीन लेखण्यात आले. त्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. उच्च वर्णीयांनी त्यांच अपरिमित शोषण केले.
(४) अतिशूद्र समाजघटकांना 'अस्पृश्य' म्हणून वाळीत टाकण्यात आले. त्यांच्यावर अत्यंत अन्यायमूलक निरबंध लादण्यात आले.
(५) महात्मा जोतीराव फुले व अन्य समाजसुधारकांनी सामाजिक समतेत जातिभेद अडथळा ठरतो असे

प्रतिपादन केले. भारतीय समाजात समता प्रस्थापित व्हावी यासाठी त्यांनी जातिव्यवस्था व त्याअंतर्गत असलेल्या अस्पृश्यता पालन या अन्यायमूलक प्रथांविरुद्ध चळवळी केल्या.

(६) भारतीय संविधानाने समता हा मूलभूत हक्क नागरिकांना बहाल केला आहे. त्याअंतर्गत जातिभेदास प्रतिबंध केला आहे. अस्पृश्यतेची प्रथा ही बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आली आहे.

**प्र. ६ पुढील प्रश्नांचे उत्तर नोंदवा :**

**(२) न्यायाची भारतीय संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर :** (१) परंपरानिष्ठ भारतीय समाजात अन्याय मूलक अशा असंख्य रूढी व परंपरा अस्तित्वात आहेत. जातिव्यवस्थेत सामाजिक उतरंडीतील कनिष्ठ जाती आणि विशेषत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींवर अन्याय होत असे. त्यांचे शोषण केले जात असे. पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान दुय्यम होते आणि त्यांच्यावरही अन्याय होत असे.

(२) भारतीय समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्था आणि पुरुषसत्ताक व्यवस्था अन्यायमूलक असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले, डॉ.आंबेडकर आणि अन्य समाजसुधारकांनी केले. न्याय प्रस्थापित करण्यासाठी या समाजव्यवस्थेत आणि मूल्य व्यवस्थेत बदल करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. आंबेडकर यांनी केले. त्यासाठी आपण प्रथम संविधानात्मक मार्गाचा अवलंब केला पाहिजे असे मत त्यांनी संविधान परिषदेत व्यक्त केले. ते पुढे असेही म्हणाले की सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वाची कार्यवाही.

(३) भारतीय संविधानात न्यायाच्या प्रस्थापनेसाठी प्रक्रियात्मक न्याय आणि सामाजिक न्याय हे दोन्ही मार्ग अवलंबण्यात आले आहेत.भारतीय संविधानाने मागासवर्गीयांचे शोषण करणाऱ्या भेदभावपूर्ण प्रथांचे निर्मूलन केले आहे.सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अनुसूचित जाती / जमाती आणि अन्य मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. दुर्बल समाजघटकांचा शैक्षणिक व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. दुर्बल समाजघटकांसाठी उच्च शिक्षण संस्थेत राखीव जागा, शिष्यवृत्ती व अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे

**उपक्रम :**

**महिलांना सुरक्षितपणे कामासाठी जाता येईल, यासाठी उपाय सुचवा.**

**उत्तर :** (१) महिलांना सुरक्षितपणे कामासाठी जाता यावे यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिलांसाठी आरक्षित आसनव्यवस्था असावी.

(२) उपनगरी रेल्वेमध्ये 'महिला विशेष' (Ladies Special) गाड्या अधिक संख्येने असाव्यात.

(३) रेल्वेमध्ये महिलांसाठी आरक्षित डब्यांमध्ये महिला/रेल्वे पोलिस कर्मचारी तैनात करावेत. त्या डब्यांत प्रवास करण्यास पुरुष प्रवाशांना मज्जाव करावा.

(४) बंदी असूनही महिलांच्या डब्यात जबरदस्तीने प्रवास करणाऱ्या गुंडांना अटक करण्यात यावी व कडक शिक्षा ठोठावण्यात यावी..